# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**


No,CGRF/AZ/JAL/162/2008/83/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Jalna Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Ramling Gunaji Narayankar, Sanmitra Coloney Partur, Near Thasil Office, Dist Jalna
(Con. No.524010114097 )

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from. Shri Ramling Gunaji Narayankar Sanmitra Coloney Partur Near Thasil Office Dist Jalna

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of excesss/average bills.**

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **19.12.2008 at 14.00 Hours**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

**Copy to:-**
Shri Ramling Gunaji Narayankar,
Sanmitra Coloney Partur,
Near Thasil Office,
Dist Jalna

**BEFORE THE CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM AURANGABAD ZONE, AURANGABAD**

**( Case No. CGRF / AZ /AUR /U / 162 / 2008 / 83 ).**

**Shri Ramling Gunaji Narayankar,**
Sanmitra Coloney Partur,
Near Thasil Office,
Dist Jalna
( Consumer No. 524010114097)

**Consumer Complainant.**

**V/s**

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPNAY LTD. Urban Circle,Aurangabad.**

**The Distribution Licensee.**

**Date:- 19.12.2008**

**Sub**: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission, (Consumer Grievance Redressal Forum and Ombudsman) Regulations, 2006.

**INTERIM ORDER**

The consumer has filed an application for passing interim order directing the Distribution Licensee for not to disconnect his residential supply as the bills issued by the D.L. are incorrect and not as per meter reading.

The grievance of the consumer was admitted as per Regulation No. 6.5 of Maharashtra Electricity Regulatory Commission The hearing on the application of the consumer was kept on 19.12.2008.

On the date of hearing , consumer representative Shri Ravindra D.Gaikwad and Nodal Officer of Distribution Licensee Shri Rathore were present. The Nodal officer stated that no details are made available to him by the concerned sub division and has no objection if the interim order for non disconnection of supply is passed.

.

Cont:

On hearing both the parties, we observed that the bills were issued to the consumer on average basis and no cognizance of his complaint was taken by the Distribution Licensee.

In view of the above observations and in the interest of justice and as per provision No.6.5, of the Regulation 2006, the Forum hereby direct the D.L. not to disconnect the electricity supply of the consumer till his grievance is redressed. The Nodal officer is further directed to admit the case in Internal Grievance Redressal committee and redress the grievance of the consumer within stipulated period as per provision mentioned in the Regulations 2006. The consumer , if not satisfied with the decision of the I.G.R.C., is free to file his grievance in this Forum

| ( H.A.Kapadia) | ( P.A.Sagane) | (V.A.Hambire) |
|---|---|---|
| **Member** | **Member Secretary** | **Chairman** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/१६२/२००८/८३**

**तक्रार दाखल दिनांक ;- १६/१२/२००८**
**निकाल दिनांक ;- २९/०१/२००९**

**श्री रामलिंग गुणाजी नारायणकर,**
**सन्मीत्र कॉलनी, परतुर तहसील ऑफीस जवळ,**
**जिल्हा जालना.**
**(ग्राहक क्र.५२४०१०११४०९७) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जालना.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १६/१२/२००८ रोजी जालना मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १९/१२/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीनुसार ते शेतमजुर असुन त्यांचा वीज वापर अत्यंत कमी आहे. महावितरण कंपनीतर्फे त्यांना सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करीत वाढीव रक्कमेचे वीज बिल देण्यात आले. हे चुकीचे वीज बिल न भरल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला होता.महावितरण कंपनीने या चुकीच्या वीज बिलाची दुरूस्ती करून न दिल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याची तसेच नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) अर्जदाराने आपल्या तक्रारी सोबत महावितरण कंपनीतर्फे देण्यात आलेल्या चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत करण्यात येऊ नये याबाबत अंतरिम आदेश देण्याबाबत च्या अर्जावर दिनांक १९/१२/२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस अर्जदार श्री रामलिंग नारायणकर तसेच नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री डहाळे उपस्थित होते. त्यांनी दाखल केलेल्या जवाबानुसार अर्जदारास सरासरीवर आधारीत वाढीव वीज बिल देण्यात आल्याचे मान्य केले व बिल रिव्हीजन करून सुधारीत वीज बिल देण्याची तयारी दर्शविली. मंचाने अर्जदाराचे वीज पुरवठा खंडीत न करण्याचा अंतरिम आदेश पारीत करीत पुढील सुनावणी ०६/०१/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

3) दिनांक ०६/०१/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी श्री सागजकर उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराचे सी.पी.एल. व बिल रिव्हीजन प्रस्ताव मंचात दाखल केला व अर्जदारास जानेवारी २००८ ते डिसेंबर २००८ या काळातील देण्यात आलेले वीज बिल कमी करून ८५ युनिट प्रतिमहा वीज बिल आकारण्याची तसेच व्याज व दंड कमी करण्याची तयारी दर्शविली.दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर तसेच अर्जदाराचे सध्या लावण्यात आलेले मीटर बंद असल्याचे आढळुन आल्यामुळे ते त्वरीत बदलुन देण्याचे आदेश देत मंचाने हे प्रकरण निकालासाठी ठेवले.

अर्जदार व नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की, महावितरण तर्फे अर्जदारास डिसेंबर २००७ पर्यत मीटर वरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारणी करण्यात येत होती. जानेवारी २००८ व त्या पुढील काळात मीटर बंद पडल्यामुळे अर्जदारास सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आलेले दिसुन येते. महावितरण कंपनीतर्फे सरासरीवर आधारीत वीज बिले चुकीचे असल्याची अर्जदाराची मुळ तक्रार आहे. जानेवारी २००८ पासुन अर्जदाराचे मीटर बंद असल्यामुळे त्यांना गेल्या १२ महिन्याच्या सरासरी वीज वापराच्या आधारावर वीज आकारणी करणे महावितरण कंपनीकडुन अपेक्षीत होते. पण तसे न करता त्यांनी अर्जदारास चुकीच्या सरासरीवर आधारीत वीज बिल दिलेले आढळुन येते. जानेवारी २००७ ते डिसेंबर २००७ या काळात अर्जदाराचा सरासरी वीज वापर हा (८२०-०३)/१२ =६८ युनिट प्रतिमहा असा असल्याचे स्पष्ट होते. यावरून महावितरण कंपनीतर्फे लावण्यात आलेले सरासरीवर आधारीत वीज बिल चुकीचे असल्याचे तसेच नोडल अधिकारी यांनी ८५ युनिट प्रतिमहा वीज आकारणी करण्याबाबचा प्रस्ताव चुकीचा असल्याचे स्पष्ट होते.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास जानेवारी २००८ ते जुने मीटर बदली करण्यात आलेल्या तारखेपर्यत ६८ युनिट प्रतिमहा याप्रमाणे वीज बिल आकारणी करावी व ते विभागुन देण्यात यावे.

२) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये तसेच अर्जदाराने या काळात भरलेल्या रक्कमेची वजावट या सुधारीत वीज बिलातुन करावी.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास वरील प्रमाणे देण्यात येणारे वीज बिल हे तीस दिवसात द्यावे.

४) महावितरण कंपनीने चुकीचे वीज बिल आकारून अर्जदारास मानसीक त्रास दिल्यावरून रूपये ५००/- नुकसान भरपाई तीस दिवसात द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

**हेमंत अ. कापडिया**
**सदस्य**

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/१६२/२००८/८३** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री रामलिंग गुणाजी नारायणकर,**
**सन्मीत्र कॉलनी, परतुर तहसिल ऑफीस जवळ,**
**जिल्हा जालना**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१६२/२००८/८३ )

आपण दिनांक १६/१२/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. जालना मंडळ, जालना**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**